RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३८

दि. २९ मे २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# पेट्रोल, डिझेलची महागाई व टंचाई हे मोदी सरकारचे पाप, आत्मनिर्भरतेचे गाजर दाखवून अर्थव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष: हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भरतेचे गाजर दाखवून अर्थव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्यानेच इंधन संकट ओढवले आहे. कोणतेही ठोस धोरण नसल्याने पेट्रोल, डिझेल, सीएनजी, एलपीजी गॅसची मोठ्या प्रमणात भाववाढ करावी लागत आहे. इंधन कमतरता होणार हे दिसत असतानाही नरेंद्र मोदी पाच राज्याच्या निवडणूक प्रचारात व्यस्त होते, त्याची मोठी किंमत देशातील जनतेला मोजावी लागत आहे. इंधन दरवाढ व टंचाई हे नरेंद्र मोदी यांचेच पाप आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, २०१४ साली सत्तेत आल्यापासूनच मोदी सरकारने इंधनाचे भाव सातत्याने वाढवले आहेत. यातून सरकारी तेल कंपन्या व रिलायन्स तसेच नायरा या खाजगी तेल कंपन्यांनी भरमसाठ नफा कमावला आहे. मोदी सरकारने तेलासाठी रिझर्व्ह फंड तयार केला असता तर ही वेळ आली नसती पण कंपन्यांचे हित लक्षात घेतले, हा मोठा भ्रष्टाचारच आहे. इंधन व गॅस चंटाईचा मोठा फटका हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, छोटे उद्योगधंदे व घरातील स्वयंपाकालाही बसला आहे. नरेंद्र मोदी यांच्या चुकीच्या धोरणामुळेच अर्थव्यवस्था कोलमडली आहे, असेही सपकाळ म्हणाले..

कांद्याप्रश्नी दिल्लीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांना महाराष्ट्राचे अर्धे मंत्रिमंडळ भेटले पण महाराष्ट्राला त्यांनी वाटाण्याच्या अक्षताच दिल्या. सरकार १५०० रुपयाने कांदा खरेदी करण्याचे सांगत आहे पण ३००० रुपये प्रति क्विंटल भाव व नाफेडमार्फत कांदा खरेदी केली पाहिजे आणि शेतकऱ्यांचा सर्व कांदा खरेदी केला पाहिजे, ही शेतकऱ्यांची मागणी आहे. नरेंद्र मोदी २०१४ साली नाशिकला आले होते, मी कांदा खाल्ला आहे, तुमच्याशी बेईमानी करणार नाही, सत्तेत आलो की २४०० रुपये भाव देणार असे आश्वासन दिले होते, तीच री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओढली होती पण आता मात्र ते फक्त १५०० रुपये भाव देण्याची भाषा करत आहेत, ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य नाही केल्या तर पुन्हा आंदोलन करु, असा इशाराही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. देशात दंगली घडवून पुन्हा २०२९ साली सत्तेत यायचे हे भाजपाचे षडयंत्र असून बकरी ईदच्या निमित्ताने जे वातावरण निर्माण करण्यात आले, ही त्या दंगलीची एक चुणूक होती. प्रत्येक सण उत्सवात हिंदू मुस्लीम मुद्दा आणायचा आणि धार्मिक वातावरण बिघडवायचे हा भाजपाचा अजेंडा आहे. तर दुसरीकडे बकरी ईद प्रश्नी भाजपाने घेतलेल्या भूमिकेमुळे पशुपालन करणाऱ्या लाखो शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी निदर्शनास आणून दिले.

या पत्रकार परिषदेला वरिष्ठ प्रवक्ते अनंत गाडगीळ उपस्थित होते.

## नसरापूर प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळेचा गेम ओव्हर, फक्त २८ दिवसात कोर्टाचा मोठा निर्णय

**नसरापूर/प्रतिनिधी :** नसरापूर येथील अल्पवयीन बालिकेवरील लैंगिक अत्याचार आणि खून प्रकरणातील खटल्याची विशेष न्यायालयात गुरुवारी सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी आरोपी भीमराव कांबळेचा गेम ओव्हर झाला आहे. आरोपी भीमराव कांबळे याच्यावर आरोपी निश्चित झाले असून फक्त २८ दिवसात पोलिसांनी सर्व न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून न्याय मिळवून देण्याता प्रयत्न केला आहे.

फार्स्ट ट्रॅक कोर्टात पहिल्यांदाच भीमराव कांबळेला कोर्टात हजर केलं जाणार होतं. पीएम रिपोर्ट, अनेक मेडिकल चाचण्या सादर केल्या गेल्या होत्या. दोन्ही बाजूंनी जोरदार आर्ग्युमेंट झाली पण अखेर आरोपीच्या वकिलांना कोणताही पुरावा सादर करता आला नाही. त्यामुळे आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात आरोप निश्चित केले गेले आहेत.



या महत्त्वपूर्ण सुनावणीस विशेष सरकारी वकील ॲड, अजय मिसर, मूळ तक्रारदाराचे वकील, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल आणि तपास अधिकारी न्यायालयात हजर होते. आता खटल्याची रोज सुनावणी होणार असून इन कॅमेरा सुनावणी होणार आहे. पोलिसांकडून फक्त १५ दिवसात चार्टशीट दाखल करण्यात आलं होतं. चार्टशीटवर सुनावणी पार पडली आहे.

दरम्यान, आरोपी भीमराव कांबळे याच्यावर नवीन कायद्यानुसार म्हणजेच 'भारतीय न्याय संहिता , २०२३' च्या कलम १०३(१), ६४, ६५(२), ७४, १३७(२), १४०(१) आणि 'पोक्सो' (पॉक्सो अॅ, २०१२) कायद्याच्या कलम ४, ६, ८ व १२ अन्वये गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. आता हे आरोप निश्चित करण्यात आले आहेत.

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त २९ ला इंदोरीकर महाराज यांचे किर्तन तर ३० ला विविध समाज उपयोगी कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा भाजपाचे नेते श्री. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त २९ मे २०२६ रोजी इंदोरीकर महाराज यांचे किर्तन होणार असून ३० मे जन्मदिनी अभिष्टचिंतन सोहळा व इतर सामाजिक उपक्रमाचे आयोजन भाजपा कार्यकर्त्यांसह मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.





भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा ३० मे जन्मिदिवस दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि विविध कामाच्या माध्यमातून साजरा केला जातो. याहीवर्षी मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांच्या आणि मित्र परिवाराच्या वतीने सर्वत्र विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनाच्या पूर्व संधेला २९ मे २०२६ शुक्रवार रोजी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती देशमुख इंदोरीकर महाराज यांचे औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे सायं. ७ वाजता किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

३० मे जन्मदिनी लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध गावातील ग्रामदेवतांना सकाळच्या वेळी महापूजा, अभिषेक करून आ. रमेशअप्पा कराड यांच्यासाठी दीर्घ आयुष्याकरिता कार्यकर्त्यांच्या वतीने प्रार्थना केली जाणार आहे. त्याच बरोबर विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मित्र परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे.

## आशियाना येथे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना बकरी ईदच्या शुभेच्छा



**लातूर/प्रतिनिधी :** बकरी ईदनिमित्त शेख गौस यांनी आशियाना येथे जाऊन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सदिच्छा भेट घेत त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी परस्पर सौहार्द, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. तसेच समाजात शांतता आणि सलोखा कायम राहावा, अशी भावना व्यक्त करण्यात आली. या भेटीदरम्यान उपस्थितांनी एकमेकांना ईद मुबारकच्या शुभेच्छा देत उत्साहपूर्ण वातावरणात सण साजरा केला.

## शाहू-बाबासाहेब यांची आरक्षण विषयक जी भूमिका तीच फकिरा ब्रिगेडची : डॉ.शिंदे

**लातूर/प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची देशातल्या अनुसूचित जाती/ जमाती व ओबीसीच्या आरक्षणासंदर्भात जी भूमिका होती तीच फकिरा ब्रिगेडची भूमिका आहे असे प्रतिपादन प्रा.डॉ.संजय शिंदे यांनी केले.

लातूर येथील मानस हॉटेल मध्ये दिनांक २७ मे २०२६ रोजी सकाळी ११ वा.फकिरा ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक पार पडली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर हे होते.

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ संजय शिंदे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात पन्नास टक्के आरक्षण दिले तेव्हाही प्रस्थापितांनी कडाडून विरोध केला होता या विरोधाला न जुमानता महाराजांनी आरक्षण दिले.



एकेदिवशी शाहू महाराजांनी अभ्यंकरला घोड्यांच्या तबेल्याकडे घेऊन गेले आणि सर्व घोड्यासाठी एका टोपलीत पेंड ठेवून घोड्यांना एकदाच सोडायला सांगितले तेव्हा जे धष्टपुष्ट, ताकदवाण घोडे होते त्यांनी मरतुकड्या घोड्यांना टोपलीतल्या पेंडीचा एक घासही खाऊ दिला नाही,तेव्हा महाराजांनी सशक्त घोड्याला वेगळी पेंड आणि अशक्त, मरतुकड्या घोड्यांना वेगळी पेंड ठेवायला सांगितली .१८९६ ला महाराजांनी आपल्या संस्थानात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढले तीन वर्षांनंतर महाराज वसतिगृहाला भेट द्यायला गेले तेव्हा तिथे एकाच जातीचे विद्यार्थी रहात असल्याचे दिसले तेव्हा शाहू महाराजांनी वसतीगृहाचे जातवार वर्गीकरण करून प्रत्येक जातीच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू केले आणि शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत आरक्षणाची तरतूदी केली आणि देशांतल्या बहुजन समाजाला माणसांत आणले.१६ जाने.१९३१ ला लंडनमध्ये गोलमेज परिषदेच्या पूर्ण अधिवेशनासमक्ष संरक्षण विषयक उपसमिती क्रमांक ७ च्या अहवालवर मत प्रदर्शन करताना सार्वजनिक नोक-यांत कोणत्याही एका जातींची मिरासदारी नको असे स्पष्ट भूमिका मांडली आहे.हे लक्षात घेऊन ज्यांना पुरेशी संधी मिळाली नाही, राजकारणात प्रतिनिधित्व मिळाले नाही,अशा समाजाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन विचार विनिमय करून सहकार्याची भूमिका घेतली पाहिजे.

मातंग आणि बौद्ध बांधवांनी एकत्रच रहायला पाहिजे त्यांनी दोन्ही समाजात कटुता निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. १९६१ ची लोक संख्या विचारात घेतली तर मातंग आणि बौध्द यांच्यात २.४७% एवढाच फरक आहे १९७१ ते २०११ या काळात बौद्ध बांधवांची शंभर टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या कशी वाढली व मातंग आणि इतर समाजाची लोकसंख्या कमी कशी झाली हा संशोधनाचा विषय आहे.मातंग समाज कोणत्याही जातीचे आरक्षण मागत नाही किंबहुना मातंग समाजातील उमेदवारांना शिक्षण, सत्ता आणि नोक-यात पुरेशी संधी मिळाली नाही म्हणून शासन सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करत असेल तर त्यास विरोध करणे म्हणजे शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील समता,बंधुता या लोकशाही मूल्यांना विरोध करणे होय असे मी मानतो असे डॉ.शिंदे म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना राजेंद्र लोदगेकर म्हणाले की, अनुसूचित जाती-जमातींमध्ये बाबासाहेबांनी सांगितलेली संविधानीक मूल्ये रूजवून समता प्रस्थापित करण्यासाठी उपेक्षित, वंचित समाजाला वेगवेगळ्या सवलती, आरक्षण दिलं पाहिजे आणि शासनाने आता समाजा-समाजात कटुता,तेड निर्माण होईल याची वाट पाहू नये,तसेच सर्व समाजातील कार्यकर्त्यांनी सामंजस्याने घेतले पाहिजे आपल्या वागण्याने, भूमिकेमुळे इतरांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे,कार्यक्रमाचे प्रस्तावित संतोष पटनुरे यांनी केले बैठकीसाठी ऋषिकेश भडंगे, गहिनीनाथ मस्के, सुदर्शन शिंदे, बाबासाहेब जोगदंड,शरद धबडगे,नंदू राऊत, सतीश मस्के,माधव शिंदे, सतीश शिंदे, भालचंद्र शिंदे, सूर्यकांत धबडगे, गोविंद धबडगे, वैभव उफाडे, विकास राऊत इ.कार्यकर्ते उपस्थित होते बैठकीचे सूत्र संचालन संजय विरूळे यांनी केले तर आभार अंकुश कांबळे यांनी मानले

## विलास सहकारी साखर कारखान्यात संचालक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर (निवळी), ता. जि. लातूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही लातूर जिल्हा सहकारी बोर्ड आणि लातूर जिल्हा उपनिबंधक (सहकार खाते) यांच्या सहकार्याने कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दिनांक २७ मे २०२६ ते २८ मे २०२६ या कालावधीत कारखान्याच्या सभागृहात हे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्री. वैजनाथराव शिंदे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक श्री. आबासाहेब पाटील यांनी केले.

या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ए. एस. शिंदे, लातूर जिल्हा सहकारी बँकेचे जिल्हा सहकारी विकास अधिकारी श्री. एस. एस. देशमुख आणि तज्ञ व्याख्याते श्री. सदाम शेख यांनी उपस्थितांना सहकार कायद्यातील तरतुदींबाबत सखोल मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणादरम्यान संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कामकाजातील समन्वय, वेळेचे प्रभावी नियोजन, उपविधीतील (-) तरतुदी, क्रियाशील सभासद होण्यासाठी आवश्यक पात्रता, सहकारातील कायदे-कानून आणि कर्मचाऱ्यांवरील ताणतणाव व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## कॅनडात २२ वर्षीय भारतीय विद्यार्थिनीची चाकूने भोसकून हत्या

नवी दिल्ली : कॅनडामध्ये एका भारतीय विद्यार्थिनीची हत्या झाली आहे. विधी कल्पेशभाई मेघानी असं हत्या झालेल्या मुलीचं नाव आहे, ती मूळची गुजरातमधल्या आणंदमधल्या बोरसदची होती. विधी कॅनडातल्या नियाग्रा भागात राहात होती. निधी कॅनडामध्ये शिक्षण घेत होती आणि नोकरीही करत होती. पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला आणि तपास सुरु केला आहे.

नेमकी काय घटना घडली?

समोर आलेल्या माहितीनुसार कॅनडामध्ये विधीची चाकूचे वार करुन हत्या करण्यात आली. विधीची हत्या का करण्यात आली? याचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. विधीच्या हत्येची बातमी समोर आल्यानंतर मेघानी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. १५ मे रोजी विधी मेघानी तिच्या नियाग्रातल्या तिच्या घरातून बाहेर पडली. त्यावेळी तिच्यावर चाकू हल्ला करण्यात आला. विधी रक्ताच्या थारोळ्यात पडली होती, तिला रुग्णालयात नेण्यात आलं, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. या प्रकरणी कॅनडा पोलीस आता विधीच्या हत्येचा तपास करत आहेत. पोलिसांनी या प्रकरणात एका आरोपीला अटक केली आहे. कॅनडातील पोलीस आता या आरोपीची चौकशी करत आहेत. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.

कॅनडामध्ये भारतीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर हल्ले होणं त्यांची हत्या होणं हे प्रकार सुरुच आहेत हे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केलं आहे. मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यात ३० वर्षीय हिमांशी खुरानाची हत्या करण्यात आली. एप्रिल २०२५ मध्ये ओंटियारोमध्ये मूळ पंजाबची असलेली २१ वर्षीय विद्यार्थिनी हरसिमकर रंधावाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी ३२ वर्षीय आरोपीला अटक केली.

गुजरातच्या तरुणीची कॅनडामध्ये हत्या, विधी मेघानी असं मृत मुलीचं नाव आहे. ती २२ वर्षांची होती. विधी मूळची गुजरातच्या आणंदमधली होती. विधी मागच्या चार वर्षांपासून कॅनडातल्या नियाग्रामध्ये वास्तव्य करत होती. १५ मे रोजी विधी घराबाहेर पडली तेव्हा रस्त्यावर लुटीच्या उद्देशाने तिच्यावर चाकू हल्ला केला आणि तिच्यावर वार केले.

विधी नियाग्रामध्ये शिक्षण घेत होती आणि नोकरीही करत होती. तसंच ही तरुणी पीआर अर्थात झीस्रहाहू ीग़्हम्ब साठीही तयारी करत होती. विधीच्या मृत्यूच्या बातमीनंतर मेघानी कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

## पाटणा जिल्ह्यातील बाढ येथे गंगा नदीत बोट उलटली; तिघांचा मृत्यू, अनेक बेपत्ता

पाटणा : पाटणा शहराला लागून असलेल्या 'बाढ' उपविभागातील सुप्रसिद्ध 'उमानाथ गंगा घाटा'वर गुरुवारी (दि.२८) सकाळी एक मोठी नौका दुर्घटना घडली. 'दियारा' प्रदेशाच्या दिशेनं जाणारी एक लहान नौका (डिंगी) अचानक तोल जाऊन गंगेच्या प्रवाहाच्या मध्यभागी उलटली. या नौकेत एकूण १५ प्रवासी स्वार होते. पहाटेच्या वेळी आपल्या शेतातून भाजीपाला काढण्यासाठी ते नदी पार करत होते. नदीच्या मध्यभागी नौका उलटल्यामुळं या दुर्घटनेत तिघांना आपला जीव गमवावा लागला. तर अनेक जण बेपत्ता झालेत.

## संपादकीय...

## वैद्यकीय शिक्षणाची गंभीर अवस्था...

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला सध्या गैरव्यवहार, अनास्था आणि प्रशासकीय दिरंगाईचे मोठे ग्रहण लागले आहे. एकेकाळी शिक्षणाचे माहेरघर आणि पुरोगामी विचारांचे केंद्र म्हणून ओळखला जाणारा महाराष्ट्र आज नीट पेपरफुटीच्या केंद्रस्थानी येऊन पोहोचला आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंची मुदत संपून सात महिने उलटले, तरीही नवीन नियुक्ती रखडलेलीच आहे. त्यातच राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या १८ वरून ३६ झाली असली, तरी त्यांपैकी एकही महाविद्यालय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे निकष पूर्ण करू शकत नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. देशातील वैद्यकीय प्रवेश परीक्षा घोटाळ्याच्या केंद्रस्थानी सध्या महाराष्ट्र सापडला आहे. राज्यातील आयुर्विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी पात्र व्यक्तींची नावे कुलपतींच्या कार्यालयाकडे पाठवून काही महिने उलटले, तरी कुलगुरूपदाची नियुक्ती रखडली आहे. शिवाय, राज्यातील सुमारे ६० टक्के शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत दीर्घकाळ प्रभारी अधिष्ठातापदाचा कार्यभार संपुष्टात आणण्यासाठी लोकसेवा आयोगाने मुलाखतींचा कार्यक्रम ऐनवेळी रद्द करून महिना उलटला, तरी मुलाखतींचा कार्यक्रम जाहीर होत नाही आणि राज्यातील महाविद्यालयांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत. वैद्यकीय शिक्षणाच्या गंभीर दुरवस्थेचे हे चित्र कुठे आहे? संपूर्ण देशालाच नव्हे, तर प्रगत देशातील विद्वानांनाही धक्का बसेल, असे महाराष्ट्राचे हे चित्र आहे. पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. परंतु, सध्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या (नीट) घोटाळ्यात या पुण्यातील काही शिक्षकांनी नैतिकतेलाच सोडचिठ्ठी दिल्याचे प्रकरण सीबीआयच्या तपासामध्ये पुढे आले. पैशाच्या मोहापायी शिक्षकांनीच पेपर फोडल्याचा आरोप आहे. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेला पुरोगामी महाराष्ट्र सध्या 'नीट' घोटाळ्याच्या केंद्रस्थानी आला आहे. या अधोगतीला वा कलंकाला जबाबदार कोण? शिक्षकांनी शिकवणी घेऊ नये, इथंपासून संस्थाचालकांनी कॅपिटेशन फी म्हणजेच डोनेशन घेऊ नये, यासाठी कडक कायदा आहे. परंतु, या कायद्याची अंमलबजावणी कोण करते? महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस यांचे साटेलोटे झाल्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलांवर शैक्षणिक अनाथ होण्याची वेळ आली आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदावर कार्यरत असलेल्या लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर यांची मुदत ७ महिन्यांपूर्वी संपुष्टात आली. या पदाच्या नियुक्ती प्रक्रियेत मार्चमध्ये मुलाखतीअंती समितीने पाच उमेदवारांची शिफारस कुलपतींना केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ या दोन विद्यापीठांना नवे कुलगुरू मिळाले. पण आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती रखडल्या आहेत. २००४ मध्ये राज्यात १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये होती. आता त्यांची संख्या ३६ झाली आहे. यापैकी एकही महाविद्यालय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या शिक्षकांचा निकष पूर्ण करण्यास पात्र नाही. राज्याचा वैद्यकीय शिक्षण विभागाच राष्ट्रीय आयोगाची दिशाभूल करून वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता मिळविण्यात यशस्वी झाला. पण आज या महाविद्यालयांत सुमारे ५० टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत आणि नव्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीचा सपाटा सुरू आहे. सध्याच्या महाविद्यालयांपैकी २० महाविद्यालयांत अधिष्ठातापदाचा कार्यभार देण्यात आला आहे. तेथे पूर्णवेळ पात्र अधिष्ठाता नाहीत. या रिक्त पदांवर नियुक्तीसाठी ११ फेब्रुवारी रोजी मुलाखतीचा कार्यक्रम होता. परंतु, तो ऐनवेळी पुढे ढकलण्यात आला आणि अद्यापही त्याविषयी स्पष्टता नाही. मध्यंतरी राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिष्ठातांची नियुक्ती लोकसेवा आयोगाच्या निवड समितीमार्फत करण्याऐवजी पदोन्नतीने करावी, असा एक प्रस्ताव तयार केला. त्यावर वैद्यकीय शिक्षण विभागाचे मत मागविण्यात आले. त्यावरही अद्याप निर्णय झाला नाही. जर बुलेट ट्रेनच्या जमान्यात आपण बैलगाडी हाकणार असू, तर महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण धोक्याच्या वळणावर उभे आहे, हे सांगण्यासाठी कोणा विद्वानाची गरज भासणार नाही.

# उष्माघाताने माझा बळी गेला तर फडणवीस जबाबदार:एकतर सरकारचा तुकडा पडेल नाहीतर माझ्या जीवाचा, ३० मे पासून उपोषण करणार- मनोज जरांगे

**आंतरवाली/प्रतिनिधी :** आंतरवालीमध्ये ३० मे रोजी रखरखत्या उन्हात बाजेवर बसत आमरण उपोषण करणार आहे. ना पाणी घेणार ना काही जे होईल ते होईल. आता उष्माघाताने माझा बळी गेला तर तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच गेला, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. आता होणारे उपोषण खूप कडक होणार आहे. वेदनांचा काहीही विचार मी करणार नाही. एकतर सरकारचा तुकडा पडेल नाही तर माझ्या जीवाचा तुकडा पडेल या भूमिकेवर मी आलो आहे.



मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण सरकारला पाहिजे त्यापेक्षा जास्त वेळ दिला आहे. २९ मे रोजी १० महिने पूर्ण होत आहेत. यापेक्षा किती जास्त वेळ सरकारला द्यायचा, गोरगरीब मराठ्यांच्याच लेकरांवर का अन्याय केला जातो? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. आपल्या समाजाला काही मिळत नसेल तर कठोर पाऊल उचलावे लागतील.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मला काही प्रसाद लाड यांना दोष द्यायचा नाही. त्यांनी सांगितले की मी मराठा आहे. पण आता त्यांचे डोळे उघडले असतील की त्यांचे देवेंद्र फडणवीस किती कलाकार आहेत आणि म्हणून आपण त्यांना बोलतो. मी उगाच कोणाला बोलत नाही. त्यांनी आमच्या माता-भगिणींना मारले म्हणून आम्ही त्यांना बोलतो. देवेंद्र फडणवीस यांच्या मनामध्ये मराठा समाजाविषयी द्वेष भरलेला आहे. त्यांना मराठा समाजावर अन्याय करायचा आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, अनेकांचे फोन आले पण मी फोनवर चर्चा करणार नाही. माझ्या समाजासाठी मी काम करत आहे. इतके क्रुर सरकार कधी आले नसेल. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाज सधन आहे म्हणून त्यांना आरक्षण देता येणार नाही, असे सरकार सांगते. मराठवाड्यात पाणी नाही आणि आरक्षण नाही. तुम्हाला जर खेटायचे असेल तर आता आपण खेटूच. अजित पवार आणि एकनाथ शिंदेंचे मंत्री आमच्याकडे येतात म्हणून त्यांना टार्गेट केले जाते. मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता निधी मिळत नाही. मराठ्यांकडे कोणता मंत्री जाऊ नये ही त्यांची भूमिका.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आता जे होईल ते होईल मी माझ्या शरीरांचा विचार करणार नाही. माझ्या समाजासाठी सर्व काही करण्याची माझी तयारी आहे. समाज बांधवांनी आंतरवालीकडे येऊ नये. सरकारला मराठा समाजाबद्दल माया असती तर त्यांनी आरक्षण दिले असते. सरकार केवळ बोलते आहे, समाजासाठी काही होणार नाही. मंडप न टाकता आम्ही हे उपोषण करणार आहोत. मला केवळ चर्चा नको आहे. तर माझ्या बांधवांना आरक्षण मिळणार आहे का? सरकार दुटप्पी भूमिका घेत आहे. पोलिस कट रचून आमच्यावर हल्ले करतात, त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जात नाही, आणि आमच्यावर गुन्हे दाखल केले आहेत.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्याचे कुटुंब उघड्यावर पडले आहेत. सरकारकडून साधेसाधे काम केले जात नाही. मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करायला किती वेळ लागतो? पण ते केले नाही. ओबीसींनी न मागता त्यांच्यासाठी मंत्रालय स्थापन करण्यात आले. मराठा आणि कुणबी एक असून सुद्धा जीआर काढला नाही. आमच्या नोकऱ्या कोणी लाटल्या. सरकारने ५० वर्षांमध्ये आमचे वाटोळे का केले. आमच्या ५ पिढ्यांचे नुकसान कोण भरूण काढणार.

# मुलगा व सावत्र आई या दोघांचीही आत्महत्या; सोनीजवळा येथे अंत्यसंस्कार

**केज/प्रतिनिधी:** तालुक्यातील सोनिजवळा येथील सावत्र आई आणि मुलाच्या अनैतिक संबंधातून ते दोघेही एक महिन्यापूर्वी हैद्राबादला पळून गेल्यानंतर, पोलिसांनी त्यांना केजला आणल्या नंतर, समाजात झालेल्या बदनामीच्या भीतीपोटी अनिल साहेबराव पवार (वय २१ वर्षे ) आणि त्याची सावत्र आई अनिता साहेबराव पवार ( वय ४० वर्षे ) या दोघांनीही कांही तासांच्या अंतराने आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली आहे. या दुहेरी आत्महत्येच्या सत्रामुळे केज तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

सोनीजवळा येथील साहेबराव पवार यांची पहिली पत्नी केवड येथील होती. तिच्याशी काडीमोड झाल्या नंतर वर्षांपूर्वी इटकूर येथील अनिता हिचेही तीच्या पतीशी जमले नाही, म्हणुन या दोघांनी ४ वर्षांपूर्वी पुनर्वीवाह केला होता. दरम्यान १२ एप्रिल रोजी साहेबराव पवार कांही कामा निमित्त मुंबईला गेल्यानंतर अनिल आणि अनिता पवार या सावत्र आई आणि मुलांनी नातेवाईकाच्या दुचाकीवरून तेलंगणा, हैद्राबाद या भागात पालायन केले होते. दरम्यान साहेबराव पवार यांच्या फिर्यादीवरून मुलगा आणि सावत्र आई बेपत्ता झाल्याची नोंद १५ एप्रिल रोजी केज पोलिसात झाली होती. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार बाबासाहेब बांगर यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे मिसिंगचा तपास करून दि. २१ मे रोजी त्यांना केज पोलीस ठाण्यात हजर करून आमच्या खाजगी कामासाठी आम्ही हैद्राबादला गेलो होतो. असा दोघांचाही जवाब घेवून त्यांना सोडून देण्यात आले होते.

दरम्यान दोघांचे पलायन आणि पोलिसांची कारवाई यामुळे समाजात आपली बदनामी झाल्याची भावना अनिल पवार च्या मनात आली आणि त्याने रवीवारी ( दि. २४ ) विषारी औषधं पिवून आत्महत्येचा प्रयत्न केला. दरम्यान त्याचा मृत्यू बुधवारी सायंकाळी झाल्यानंतर उत्तरीय तपासणी करून गुरूवारी पार्थिव सकाळी पार्थिव नातेवाईकांच्या स्वाधीन करणार होते.आपल्या सावत्र मुलाच्या आणि प्रियंकाराच्या मृत्यू नंतर स्वाराती रुग्णालयातच अडलेल्या अनिता पवार प्रियकराची मृत्यू नंतर त्याचे पार्थिव सोनीजवळा येथे घरी परत आणल्यानंतर आपले हे छुपे संबंध आता कुटुंब आणि संपूर्ण समाजासमोर उघड झाले आहेत, या विचाराने अनिलने तर आत्महत्या केली.सावत्र आई म्हणुन मी समाजाला तोंड दाखवणे कठीण झाल्याच्या नैराश्यातून तीने व्यंकटराव डावळे सभागृहामागे एका झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली.

वैद्यकीय अधिकारी डॉ निलेश पुरी आणि डॉ नितीन साखरे यांनी तपासणी करून मृत घोषित केले. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक कांदे, जमादार मंगेश भोले यांनी पंचनामा करून पार्थिव उत्तरीय तपासणीला पाठविले.. अनिल आणि अनिता पवार या माय, लेकरांच्या पार्थिवावर सोनीजवळा जेथे गुरूवारी सायंकाळी साडे सहा वाजताएकाच चितेवर अंत्य संस्कार करण्यात आले.. सावत्र आई आणि मुलगा यांच्या प्रेमाच्या नात्यांमधील हा दुर्दैवी अंतझाल्यामुळे, तालुक्यात सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे..

# आरोपीला मदत करण्यासाठी मागितली १ लाखाची लाच; पदोन्नती मिळालेल्या पोलीस उपनिरीक्षकावर कार्यमुक्तीच्या दिवशीच गुन्हा दाखल

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात एक धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. नगर तालुका पोलीस ठाण्याचा पोलीस उपनिरीक्षक गांगुर्डे हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. एका गुन्ह्यात आरोपीला मदत करण्यासाठी तडजोडीअंती तब्बल १ लाख रुपयांची लाच स्वीकारण्यास संमती दर्शविल्याप्रकरणी गांगुर्डेच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, पदोन्नती मिळाल्यानंतर कार्यमुक्त होण्याच्या दिवशीच ही कारवाई झाल्याने पोलीस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर येथील नगर तालुका पोलीस ठाण्यात १५ जणांवर एक गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील आरोपीला मदत करण्यासाठी आणि कायदेशीर प्रक्रियेत सवलत देण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक गांगुर्डे याने १ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत 'एसीबी'च्या पथकाने संपूर्ण प्रकरणाची गुप्तपणे शहानिशा केली. यामध्ये गांगुर्डे याने १ लाखाची लाच स्वीकारण्यास संमती दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

पोलीस उपनिरीक्षक गांगुर्डे याला काही दिवसांपूर्वीच पोलीस उपनिरीक्षक पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती मि ळाली होती. पदोन्नतीनंतर पोलीस मुख्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षणासाठी त्याची निवड झाली होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे त्याला तातडीने कार्यमुक्त करण्यात आले नव्हते.

अखेर ज्या दिवशी गांगुर्डे याला प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त केले जाणार होते, त्याच दिवशी हा लाचखोरीचा प्रकार उघडकीस आला. पोलीस मुख्यालयातच १ लाखाची लाच स्वीकारण्याची संमती दर्शवणे गांगुर्डेला महागात पडली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गांगुर्डेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास 'एसीबी'चे अधिकारी करत आहेत.

# संशयाचं भूत मानगुटीवर बसलं; कपड्यांच्या दुकानात शिरला, प्रेयसीला लाथा-बुक्क्यांनी अन् चापटांनी हाणलं

**पिंपरी चिंचवड/प्रतिनिधी :** पिंपरी चिंचवड शहरात एका कपड्यांच्या दुकानात घुसून प्रियकराने आपल्याच प्रेयसीला बेदम म ारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संशयावरून झालेल्या वादातून हा प्रकार घडला असून, संतप्त तरुणाने तरुणीला लाथा-बुक्क्यांनी आणि चापटांनी अमानुषपणे मारहाण केली. हा सर्व थरार दुकानात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर म ोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या घटनेम ुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.विशेष म्हणजे, प्रेयसीला बेदम मारहाण केल्यानंतर या तरुणाचा राग शांत झाला आणि त्याने तात्काळ दुकानातच प्रेयसीचे पाय धरून तिची माफी मागितली. हा मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. मात्र, इतका गंभीर प्रकार घडून आणि अमानुष मारहाण सहन करूनही संबंधित तरुणीने आपल्या प्रियकराविरोधात पोलिसांत कोणतीही तक्रार देण्यास साफ नकार दिला आहे. हा आमचा अंतर्गत वाद असल्याचे सांगत तिने कारवाई करण्यास नकार दिला असला, तरी या घटनेबाबत नागरिकांम धून तीव्र संताप व्यक्त होत आहे.या घटनेनंतर महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे झालेल्या मारहाणीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी तरुण संतापाच्या भरात तरुणीला मारहाण करताना दिसत आहे. दुकानातील कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांनी मध्ये पडून हा प्रकार थांबवण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे.

मात्र, काही क्षणांतच आरोपीने आपली चूक लक्षात आल्याने प्रेयसीची माफी मागितल्याचेही व्हिडिओमध्ये दिसून येत आहे.

रायगडच्या माणगाव तालुक्यातील घरोशीवाडी मधील एका १५ वर्षीय अल्पवयीन तरुणीची धारधार शास्त्राने हत्या करण्यात आली. या तरुणीचा मृतदेह गावालगत असणाऱ्या डोंगराळ भागात सापडला होता, त्यानंतर गावात एकच खळबळ उडाली होती. घटनेची माहिती पोलिसांना मिळताच या प्रकरणी चार वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. त्यानंतर २४ तासाच्या आतम ध्ये माणगाव पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

# मनोज जरांगेंच्या लाडाखातर दोन बेकायदेशीर आरक्षणे सुरू:उपोषणाच्या इशाऱ्यानंतर गुणरत्न सदावर्तेंची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे हे येत्या ३० तारखेपासून पुन्हा एकदा उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या उर्वरित मागण्या सरकारकडून अद्याप मान्य झालेल्या नसल्याने त्यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे अस्त्र काढले आहे. यावर आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी जोरदार टीका केली आहे. तसेच अनाथांना आरक्षण देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद करत मनोज जरांगे यांच्या लाडाखातर बेकायदेशीर दोन आरक्षण सुरू असल्याची टीका केली आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, माझ्याकडे अनाथ मुलं जी म्हणजे जे आई वडील गेल्यामुळे अनाथ झाले आणि जी मुलं ज्यांना आई-वडीलच माहीत नाही, अशा लोकांनी मला निवेदन पाठवले आहे. देशात इतरत्र एक टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण दिले जात आहे असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणजे तेलंगण असेल. तर मला असे वाटते की हा खरा घटक आहे की ज्यांना आरक्षणाची गरज आहे. म्हणजे एक टक्का आरक्षण असेल तर काय होत आहे, १०० जागा असतील तर त्यांच्या वाट्याला जागाच येत नाही. अनाथांच्या बाबतीत सकारात्मक विचार होणे गरजेचे आहे. त्यामुळे अनाथांचे आरक्षण १ टक्क्यापेक्षा जास्त वाढले पाहिजे.

**जरांगेच्या लाडाखातर बेकायदेशीर दोन आरक्षण**

पुढे बोलताना मनोज जरांगे यांच्या उपोषणावर आणि त्यांनी मागीतलेल्या आरक्षणावर टीका करताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, मनोज जरांगे यांनी जे आरक्षण मागितले आहे, म्हणजे त्याच्या लाडाखातर बेकायदेशीर दोन दोन आरक्षण सुरू आहेत, त्यावर व्हाइट पेपर पब्लिश करा. येणाऱ्या आधिवेशनात पब्लिश करा. एसीबीसी म्हणून किती लाभ झाले आहेत नोकऱ्यांमध्ये, महाविद्यालयांमध्ये- एमबीबीएस, बीडीएस, अभियांत्रिकीला आणि कुणबी मराठा म्हणून किती प्रवेश झाले आहेत आणि किती लाभ झाले आहेत. ही जिम्मेदारी आहे सरकारची. अनाथांसाठी आरक्षण वाढवून द्या.

**या अनाथांसाठी कोणाचे नेतृत्व नसणार**

मला माहीत आहे या अनाथांसाठी कोणाचे नेतृत्व नसणार आहे. परंतु, माझी हात जोडून विनंती आहे, या अनाथांना १०० जागा नसतात म्हणून एक टक्का आरक्षण मिळत नाही. कारण रोस्टरला एक जागा येण्यासाठी १०० जागा असाव्या लागतात. या अनाथांचा नाथ कोणीतरी बनले पाहिजे आणि म्हणून माझी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे की अनाथांना त्यांच्या आरक्षणात वाढ झाली पाहिजे. या आरक्षणाला कोणाचाच विरोध असणार नाही, असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले.

**उन्हात बसतो.. उन्हात बसतो, मरतो मरतो मरतो**

मनोज जरांगे यांच्यावर टीका करताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, खिलाडी पुराना हें, मगर रील नया हे. मनोज जरांगे, पोलिटिकल इन्फ्लुएन्सर. जेव्हा राजकारणी



डाउनफॉलला असतात तेव्हा ते मनोज जरांगेकडे जातात. आज आपणाला हे बोलत असताना मला दोन गोष्टी आवर्जून सांगायच्या आहेत. ते म्हणाले, उन्हात बसतो.. उन्हात बसतो, मरतो मरतो मरतो, अरे उन्हात बसतो.. उन्हात बसतो, मरतो मरतो मरतो.. बाजावर बसतो बाजावर बसतो, छातीत धडकी घेऊन बसतो.. आता मरतो, आता मरतो, आता मरतो.., अशी कविता सदवार्ते यांनी सादर केली. मनोज जरांगे अशा प्रकारे स्वतःच्या प्रकृतीवर घाला घालून घेत असतील आणि ही व्यक्ती भावनिक, एक हिंदी म्हण आहे, भावनिक वातावरण तयार करून गौरण घालत आहेत, अशी टीका सदावर्ते यांनी केली आहे.

# सम्राट अशोकांची कन्या भिक्खुणी संघमित्रा महाथेरी यांच्या श्रीलंका प्रयाण दिना निमित्ताने नालासोपारा येथे इंडो श्रीलंका विरासत कार्यक्रम संपन्न

## कोळी बांधवांचे सिद्धार्थ गौतम बुद्ध व बुद्ध धम्म प्रचार प्रसारात विशेष योगदान








**नालासोपारा / विशेष प्रतिनिधी :** तथागत गौतम बुद्धांच्या पदस्पर्शने पावन झालेल्या नालासोपारा (प्राचीन नांव सुप्पारक) येथून सम्राट अशोकांची कन्या भिक्खुणी संघमित्रा महाथेरी हिने बुद्धगया येथील प्रवित्र बोधी वृक्षाची फांदी घेऊन इ.स पूर्व तिसऱ्या शतकात श्रीलंकेला प्रयान केले होते. कोळी समाजाच्या होडीने संघमित्रा महाथेरी यांच्या श्रीलंका प्रयान दिनानिमित्त नालासोपारा येथील कळंब बीचवर इंडो श्रीलंका विरासत हा लक्षवेदी प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न झाला.संघमित्रा गंधकुंटी बुद्ध विहार ट्रस्ट नालासोपारा आणि इंडो श्रीलंका विरासत समिती यांच्या संयुक्तविद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला श्रीलंका व भारतातील विविध भागातील पूज्य भंते,भिक्खुणी व धम्म उपासक उपासिका यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

दरवर्षी आषाढ महिन्यातील आषाढ पौर्णिमेला हा उत्सव साजरा केला जातो. पण आषाढ महिन्यात पावसामुळे समुद्राला तुडुंब पाणी असते म्हणून त्या अगोदर २४ मे २०२६ ला संघमित्रा श्रीलंका प्रयाण दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी महाथेरी भिक्खुणी संघमित्रा यांच्या प्रयाणाचा लक्षवेधी प्रतिकृती देखावा सादर करण्यात आला.यावेळी कळंब बीचवर कोळी बांधवांनी दोन बोटी उत्तम प्रकारे सजवल्या होत्या, त्या दोन बोटीने संघमित्रा व भिक्खुणी संघाला श्रीलंकेला घेऊन जात आहेत. त्यांना निरोप देण्यासाठी सम्राट अशोक आणि राणी विदिशा प्रतिकात्मकरित्या वेशभूषा केलेले धम्म उपासक उपासिका भिक्खुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचं बरोबर श्रीलंकेचा राजा व राणी भिक्खुणी संघमित्राचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते असा,प्रतिकृती देखावा कळंब बीचवर सादर करण्यात आला.त्यात ऐरोलीच्या जेष्ट धम्म उपासीका शशिकला जाधव ताई यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीलंका धम्म उपासीका ग्रुपने श्रीलंकन लुक मधील उपासिका अरुणा अहिरे,कविता हिवाळे,पल्लवी शिंदे,प्रज्ञा आढाव,पुजा आपटे,सुनिता तायडे,लक्ष्मी शेंडगे,संघमित्रा अहिरे,मनश्री तांबे,दिया अहिरे,कमल देशपांडे,शिवानी (राणी विदिशा) श्रीलंकन धम्म उपासिकांची लक्षवेधी वेशभूषा करून स्वागत केले.

नालासोपारा येथिल प्राचीन बौद्ध स्तुपावर सकाळी १० वाजता बुद्ध वंदना घेण्यात आली.त्यानंतर धम्म देशना, प्रवचन झाले.१२ वाजता भिक्खु संघ भिक्खुणी संघ यांना भोजन दान देण्यात आले. धम्म उपासक उपासिकांच्या भोजना नंतर ३ वाजता बौद्ध स्तूप ते कळंब बीच रैली काढण्यात आली.ताज प्लेज रिसॉर्ट ते कळंब बीच बोटीवर भिक्खुणी संघाची धम्म यात्रा निघाली.बोटीवर भिक्खुणी संघ संघमित्रा सोबत बसल्यावर त्यांना प्रतिकात्मकरित्या निरोप देण्यात आला.समुद्रात फिरून आल्या नंतर भिक्खुणी संघमित्राच्या भिक्खुणी संघाचे श्रीलंकेवरून परत आल्याचा प्रतिकात्मकरित्या आगमनचे स्वागत करण्यात आले.आणि तिसऱ्या शतकातील हा प्रभावी लक्षवेधी प्रेरणादायी देखावा निर्माण करण्यात आला.त्यांचा लाभ उपासक उपासिकांच्या ग्रुपने आपल्या मोबाईल मध्ये व्हिडीओ बनवून व छायाचित्रे काढून मोठ्या उत्स्फुर्तपणे सेव्ह केला.

भारतातील बुद्धधम्म टिकवून ठेवण्यासाठी बुद्ध धम्माची परंपरा प्रथा व संस्कार यांचे जतन करणे महत्वाचे आहे.त्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजक करण्यात आले होते.असे भिक्खुणी संघमित्रा यांनी सांगितले.बुद्ध धम्मात भिक्खु संघ आहे.पण भिक्खुणी संघ अध्याप नाही. भिक्खुणी संघाची स्थापना करण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत.भिक्खु- भिक्खुणी संघाचे अनेक धम्म उपासक उपासिका व मान्यवरांनी स्वागत केले.समता सैनिक दलातर्फे बोधि वृक्षाला सलामी देण्यात आली.या कार्यक्रमाला वसई विरार महानगरपालिकेचे महापौर अजीव यशवंत पाटील,उपमहापौर मार्शल लोपीस,नगरसेवक परेश किणी,प्रा.धम्मदर्शन,भन्ते राहुल मित्र,डॉ. प्रफुल लोखंडे,दैनिक सम्राटचे कुणाल कांबळे,पत्रकार सागर तायडे,विजय कसबे,रेखाताई कांबळे,प्रा.संजीवनी साळवे,ज्योती थाटे,सुनिता तायडे,चंद्रकला तायडे,अंजना वानखडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित बौद्ध भिक्खू संघाच्या हस्ते महापौर,उपमहापौर आणि नगरसेवकांना सन्मानचिन्ह, शिवश्री सुधाकर लाड लिखित एक संशोधनात्मक ऐतिहासिक दस्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी योगदान देणारा भूमिपुत्र मूलनिवासी कोळी समाज ही स्मृतीपुस्तिका आणि पवित्र कमळाचे फूल देऊन सत्कार करण्यात आला.धम्मपिठा वरुण बोलताना मान्यवरांनी भारत आणि श्रीलंका यांच्यातील प्राचीन बौद्ध वारसा आणि नालासोपारा शहराचे ऐतिहासिक महत्त्व यावर प्रकाश टाकला.सम्राट अशोक आणि त्यांच्या सुकन्या संघमित्रा यांनी धम्माच्या प्रसारासाठी केलेले त्याग आणि कार्य आजही संपूर्ण जगाला शांततेचा मार्ग दाखवणारे आहे,असे प्रतिपादन मान्यवरांनी केले

.या सोहळ्यासाठी मुंबई,ठाणे,बदलापूर नाशिक,पुणे,पनवेल,रायगड,भांडूप,एरोली ,खरघर व संपूर्ण नालासोपारा परिसरातील बौद्ध उपासक व उपासिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित होते.सम्राट अशोकांची कन्या संघमित्राला श्रीलंकेला होडीने जाण्यासाठी मदत करणारा कोळी बांधव यांचे सिद्धार्थ गौतम बुद्ध व बुद्ध धम्माशी विशेष नांत आहे.

हा प्रतिकात्मक प्रयान दिन साजरा करण्यासाठी आगरी कोळी समाजाचे विचारवंत नेते राजाराम पाटील यांच्या योगदानातून स्थानिक कोळी बांधवांनी मोठ्या प्रमाणात धम्म दान गोळा करून दिले. त्याचा बरोबर उल्हास केणी यांचा ताज पॅलेस प्रतिक बीच रिसॉर्ट दोन दिवस भिक्खु- भिक्खुणी संघाच्या राहण्यासाठी व कार्यक्रमासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यामुळे सम्राट अशोकांची कन्या भिक्खुणी संघमित्रा महाथेरी यांच्या श्रीलंका प्रयाण दिना निमित्ताने नालासोपारा येथे इंडो श्रीलंका विरासत कार्यक्रम यशस्वी झाला.

## विविध वृत्त...

### मस्साजोगमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ दीड महिन्यात दुसऱ्यांदा चोरी

**केज/प्रतिनिधी:** तालुक्यातील मस्साजोग येथे अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, पाझर तलावातील मागील एक ते दीड महिन्याखाली चाळीस ते पन्नास शेतकऱ्यांचे वायर अज्ञात चोरट्यांने चोरी करून नेल्याच्या घटनेला विसर पडत नाही. तोपर्यंत चोरीची दुसरी घटना घडली आहे. दोन शेतकऱ्यांच्या विद्युत पंपासह वायर आणि चार ते पाच शेतकऱ्यांच्या मोटारीच्या वायरची अज्ञात चोरट्याने चोरी करण्याची घटना सोमवारी (दि. २५ ) मध्यरात्री घडली आहे.

घटना घडल्यानंतर सकाळी शेतकऱ्यांच्या निदर्शनास आली आहे. चोरीच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून शेतकऱ्यांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. व संतापाची लाट आणि भितीचे वातावरण पसरले आहे. अज्ञात चोरट्यांचा माग काढून लवकर चोरट्यांना जेरबंद करण्यासाठी पोलिसांनी योग्य उपाययोजना करण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. या चोरीच्या घटनेत सुदर्शन देशमुख, सुनील गायकवाड यांच्या पाच इंच एचपीचा पंप आणि २५० फूट वायर चोरून नेली आहे. मदन जिवनराव देशमुख यांच्या शेतातील २०० फूट वायर, तर फुलचंद दिंगाबर देशमुख २०० फूट वायर, परमेश्वर सदाशिव देशमुख २०० फूट वायर, प्रवीण प्रकाश देशमुख २०० फूट वायर मिळून एकूण १ हजार २५० फूट वायर आणि दोन विद्युत मोटारी चोरून नेल्या आहेत.

### साखर उद्योगाला दिलासा मिळणार, 10 दिवसांत मोठे निर्णय होणार

कोल्हापूर : दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वाच्या बैठकीनंतर राज्यातील साखर कारखानदारीला मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. एफआरपी वाढली, मात्र साखरेच्या विक्री दरात वाढ झाली नसल्याने कारखाने आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर साखरेचा एमएसपी वाढविणे, इथेनॉलचे दर वाढविणे आणि सॉफ्ट लोन देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे संकेत केंद्र सरकारने दिले आहेत.नवी दिल्ली येथे बुधवारी महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची सकारात्मक चर्चा झाली. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. दिल्लीतील बैठकीत साखर उद्योगासमोरील गंभीर आर्थिक अडचणींवर चर्चा झाली. साखरेचा किमान विक्री दर वाढवणे, इथेनॉलचे दर वाढवणे, सॉफ्ट लोन योजना सुरू करणे आणि कारखान्यांच्या कर्जाची पुनर्रचना करणे या प्रमुख म ागण्या मांडण्यात आल्या.

## श्रीकांत शिंदे यांचा मराठवाड्यात शिवसंवाद दौरा; टीका करणं हाच त्यांचा टाईमपास, आदित्य ठाकरेंवर साधला निशाणा

**जालना/प्रतिनिधी :** शिवसेनेच्यावतीनं म राठवाड्यात 'शिवसंवाद दौऱ्या'ला सुरुवात झाली असून, २३ विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेत पक्षबांधणीला गती दिली जाणार असल्याची माहिती खासदार श्रीकांत शिंदे (एपीग्झरहू एप्ह्) यांनी जालन्यात दिली. कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या भावना आणि मत जाणून घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. संभाजीनगर-जालना विधान परिषद निवडणुकीबाबत बोलताना श्रीकांत शिंदे म्हणाले की, ''महायुतीतील वरिष्ठ नेत्यांम ध्ये जागावाटपाबाबत बैठका सुरू आहेत. अद्याप अंतिम निर्णय झालेला नसला, तरी लवकरच चित्र स्पष्ट होईल. शिवसेनेचे शिष्टमंडळ महायुतीतील इतर पक्षांच्या नेत्यांसोबत चर्चा करत आहे.'' दरम्यान आदित्य ठाकरे यांच्यावर हल्लाबोल करताना त्यांनी, टीका करणं हाच त्यांचा टाईमपास असल्याचं स्पष्ट केलं.

काय म्हणाले खासदार श्रीकांत शिंदे? : अभिमन्यू खोतकर यांच्या कामाचं कौतुक करताना पक्ष त्यांच्या कामगिरीवर बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं त्यांनी म्हटलं. तर छगन भुजबळ यांच्या स्वबळाच्या घोषणेवर प्रतिक्रिया देताना, ''तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. आम्ही त्यांना शुभेच्छा देतो,'' असं त्यांनी सांगितलं. म राठवाड्याबाबत बोलताना श्रीकांत शिंदे म्हणाले की, ''मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी या भागासाठी अनेक विकासकामं केली. बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलेल्या ''८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण'' या भूमिकेवर शिवसेना आजही ठाम आहे. पक्ष प्रत्येक कार्यकर्त्याचा योग्य वेळी योग्य विचार करतो, याचं उदाहरण म्हणजे महिला कार्यकर्त्या ज्योतीताई वाघमारे यांना राज्यसभेवर संधी दिली गेली,'' असंही त्यांनी सांगितलं.

मराठा आरक्षणावर सरकार तोडगा काढेल : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी सांगितलं की, ''मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या अनेक मागण्या पूर्ण केल्या आहेत. मनोज जरांगे यांच्या मागण्यांवरही सरकार सकारात्मक विचार करून तोडगा काढेल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आदित्य ठाकरे यांच्यावर केली जोरदार टीका : कांदा प्रश्नावरही त्यांनी भाष्य केलं. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची आज केंद्रीय मंत्रिमंडळासोबत बैठक असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षावर आणि आदित्य ठाकरे यांच्यावरही श्रीकांत शिंदे यांनी जोरदार टीका केली. ''फक्त टीका करत बसल्यामुळं अडीच वर्षात त्यांची ही परिस्थिती झाली. एकनाथ शिंदे यांनी उठाव केला तेव्हाही त्यांनी टीका केली,

# केज येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

## ५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना दिली अनोखी मानवंदना





**केज/प्रतिनिधी:** प्रजावत्सल आणि आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून केज शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून आयोजित केलेल्या या शिबिराला तरुण आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, अत्यंत उत्साही वातावरणात हे शिबिर संपन्न झाले.

जयंती उत्सवाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक ज्येष्ठ नागरिक व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या रक्तदान शिबिरास केज नगरीच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, गटनेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, उपनगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट, शिवसेना उ.बा.ठा. गटाचे नेते रत्नाकर शिंदे, सौरभ सोनवणे, रणजीत आडसकर, नगरसेवक बालासाहेब जाधव, नगरसेवक बाळासाहेब गाढवे यासह विविध संघटनेचे व पक्षाचे पदाधिकारी यांनी भेट दिली.

यावेळी अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याचे आणि जलव्यवस्थापनातील त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. केवळ पारंपारिक पद्धतीने जयंती साजरी न करता, समाजातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन या विधायक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल उपस्थितांनी संयोजकांचे कौतुक केले. सकाळपासूनच शिबिराच्या ठिकाणी रक्तदानासाठी तरुणांनी मोठी गर्दी केली होती.

विशेष म्हणजे, यामध्ये पहिल्यांदाच रक्तदान करणाऱ्या नवोदित तरुण-तरुणींची संख्या लक्षणीय होती. करून घेण्यात आले. या शिबिरात दिवसभरात एकूण ५३ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. सर्व रक्तदात्यांना संयोजकांच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी केज शहरातील विविध पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव समिती, शिव मल्हार प्रतिष्ठान मंडळांचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. या कौतुकास्पद उपक्रमामुळे केज परिसरामध्ये सर्वत्र समाजोपयोगी जयंती साजरी केल्याबद्दल आनंद व्यक्त होत आहे.

आदर्श रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर, रक्तपेढी प्रमुख डॉ.इलियाज पटेल पॅथॉलॉजी पर्यवेक्षक साक्षी बेलोरे, रोहन खरात, संध्या सुरवसे, आनंत सारूक, तसलीम काझी आदींनी रक्त संकलनाचे काम पूर्ण केले. या शिबिरामध्ये एकमेव महिला सौ.रंजना रोडे यांनी रक्तदान केले त्याबद्दल जयंती उत्सव समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. रक्तदाते:-सौ. रंजना दिगांबर रोडे,माऊली रोडे, कृष्णा रोडे, बाबुराव रोडे ,राम डुकरे, अशोक निंगुळे, मनोज कदम, अरविंद बोबडे ,भारत दांगट, माजी नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट, लक्ष्मण कोल्हे ,कृष्णा गाढवे ,निखिल काळे, गणेश कांदे, अतिश गाढवे, भागवत काळे ,सुभाष निंगुळे,प्रतीक भोसले आदित्य गायके, ईश्वर गायके, सुंदर रोडे, सागर माळी, दया भोसले,शैलेश भूतकर, केशव रोडे, अरबाज कुरेशी, सार्थक सुडके, संदीप जाधव, नगरसेवक बालाजी जाधव, रंजीत जाधव, सखाराम गायके, उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी गाढवे, अभिजीत भालेकर,ओम मुळे महेश रोडे, प्रशांत गुंड,मंगेश सातपुते ,अभी गायकवाड, रामदास डापकर, राम गाढवे, राजेश्वर रोडे आदी रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# प्रभाग व बूथ पातळीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करा

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे काँग्रेस कार्यकर्त्यांना आवाहन

## लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे नूतन अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी** : काँग्रेस पक्ष संघटनेत कार्यकर्ता घडत असतो आणि दिवसेंदिवस संघटनेला अधिक महत्त्व येत आहे. सर्वांच्या सहकार्याने आपण लातूर शहर महानगरपालिकेत बहुमताने सत्ता स्थापन केली आहे. तर जिल्हा परीषदेला काठावर सत्ता गेली आहे, आता आगामी काळात काँग्रेसची सत्ता आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रभाग आणि बूथ पातळीपर्यंत संघटना अधिक मजबूत करावी, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.





राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २८ मे रोजी दुपारी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियानाअंतर्गत लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. शिवाजी जवळेकर यांची नव्याने निवड झाली असून लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. अभय साळुंके यांची फेरनिवड झाली आहे. त्यांच्या पदग्रहण सोहळ्यास उपस्थित राहून त्यांचा सत्कार करुन पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या, या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष किरण जाधव यांचा सत्कार करून त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, गटनेते विजयकुमार साबदे, माजी महापौर दीपक सूळ, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष किरण जाधव, समद पटेल, विष्णुदास धायगुडे, मोइन सय्यद, विद्याताई पाटील, कैलास कांबळे, प्रवीण कांबळे, व्यंकटेश पुरी, सुपर्ण जगताप, महेश म्हेत्रे, आनंद वैरागे, संजय ओहळ आदिसह काँग्रेसच्या फ़रटल संघटनेचे विविध पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष नगरसेवक कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेस पक्षासाठी आज आनंदाचा दिवस आहे. पक्षाचा अध्यक्ष म्हणून नूतन निवड झालेल्या अध्यक्षांनी पक्षाला न्याय दिला पाहिजे दिवसेंदिवस संघटनेला अधिक महत्त्व येत आहे, पक्ष संघटनेत कार्यकर्ता घडत असतो. नवनिर्वाचित अध्यक्षांना मदत करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू, सर्वांच्या सहकार्याने आपण लातूर शहर महानगरपालिकेत सत्तेत आलो तसेच काठावर जिल्हा परिषदेत बहुमता पासून आपण दूर राहिलो, येणाऱ्या काळात लातूर जिल्हा परिषदेत आपली सत्ता येईल, शहरात बूथ पातळीपर्यंत संघटना अधिक मजबूत असली पाहिजे, प्रभाग व बूथ कार्यकारणी लवकरच गठीत केली गेली पाहिजे, केंद्र सरकारच्या अपयशी धोरणाची चर्चा गल्लीबोळात झाली पाहिजे, देशात राज्यात बदलाच वार वाहू लागले आहे असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, एसआयआर व जनगणना सुरू आहे, या दोन्ही विषयाबाबत काँग्रेस कार्यकर्त्यांनी लक्ष द्यावे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी, देशाच्या नेत्या प्रियंका गांधींनी एक अभियान राबविले त्या अंतर्गत नूतन जिल्हाध्यक्षांच्या निवडी जाहीर झाल्या आहेत. जिल्हाध्यक्षांना येणाऱ्या काळात अधिक अधिकार देण्यात येणार आहेत, सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन आपण काम करू असे त्यांनी यावेळी बोलतांना सांगीतले.

यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष किरण जाधव यांनी केले तर लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी जवळगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रवीण सूर्यवंशी यांनी केले तर शेवटी आभार प्राध्यापक प्रवीण कांबळे यांनी मानले

### माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बोरवटी येथील सरपंच गणेश नाथजोगी यांच्या निवासस्थानी दिली भेट



**लातूर/प्रतिनिधी** :राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २७ मे रोजी सायंकाळी लातूर तालुक्यातिल बोरवटी येथील सरपंच गणेश नाथजोगी यांच्या निवासस्थानी भेट दिली तसेच गावातील रस्ते, नाली, वीज, शेतरस्ते पाणीपुरवठा आदि विविध विकास कामासंदर्भात गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आडीअडचणी जाणून घेऊन संबंधितांना त्या सोडवण्यासाठी तात्काळ सूचना केल्या. प्रारंभी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लोकनेते विलासराव देशमुख व कैलासवासी माणिकराव नाथजोगी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, विलास को-ऑपरेटिव बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हाईस चेअरमन समद पटेल, लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर कैलास कांबळे, विष्णुदास धायगुडे, पप्पू देशमुख, गणेश एसआर देशमुख, बापू चव्हाण, रघुनाथ शिंदे, ग्रामसेवक ऐ.व्ही.मडके, मंडळ अधिकारी महेश हिप्परगे, कृषिसहायक पि.डी.बैले, वि.का.से.सो.चेअरमन रावसाहेब लकडे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष नेताजी पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष ज्योतीराम लकडे, कमलाकर इडेकर, भरत शिंदे, उपसरपंच अमोल माने, पंडीत ढमाले, रघुनाथ शिंदे, ईश्वर टेकाळे, आप्पासाहेब नाथजोगी संदीप माने आदींसह बोरवटी ग्रामस्थ उपस्थित होते.

### याने माझा वापर केला भावाला मेसेज पाठवून आयटी इंजिनिअर तरुणीची आत्महत्या!

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. उच्चशिक्षित आयटी इंजिनिअर तरुणीने मुठा नदीत उडी घेत आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. याघटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. मृत्यूपूर्वी तरुणीने आपल्या भावाला पाठवलेल्या मेसेजमुळे या प्रकरणाला गंभीर वळण मिळालं आहे. भावाच्या दिलेल्या माहितीनुसार पोलीस पुढील तपास करत आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत तरुणी एका नामांकित आयटी कंपनीत इंजिनिअर म्हणून कार्यरत होती. तिचे एका चप्पल विक्रेत्यासोबत प्रेमसंबंध होते. तीन महिन्यांपूर्वीच तिने कुटुंबीयांना या नात्याबद्दल सांगितले होते. दोघे लवकरच लग्न करणार होते. मात्र कुटुंबीयांनीही या नात्याला विरोध केला नव्हता.

मात्र, काही दिवसांपूर्वी तरुणीने आपल्या भावाला मेसेज करून प्रियकराने आपली फसवणूक केल्याचा आरोप केला. त्याने माझा वापर करून मला विसरून जाण्यास सांगितलं, असं तिने मेसेजमध्ये म्हटलं होतं. या घटनेनंतर ती तीव्र मानसिक तणावाखाली गेल्याचं कुटुंबीयांनी सांगितले.

काही दिवसांनी खराडी पोलिसांकडून कुटुंबीयांना फोन आला आणि मुठा नदीपात्रात एका तरुणीचा मृतदेह सापडल्याची माहिती देण्यात आली. ओळख पटवल्यानंतर मृतदेह संबंधित तरुणीचाच असल्याचं स्पष्ट झालं. या घटनेने कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

तरुणीच्या भावाने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत, प्रियकराच्या फसवणुकीमुळेच बहिणीने आत्महत्येचा निर्णय घेतला, असा आरोप केला आहे. पोलिस आता संबंधित तरुणाच्या भूमिकेची चौकशी करत आहेत, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. कुटुंबीयांनी अनेकदा समजावून सांगूनही तरुणीला प्रेमसंबंधातून बाहेर पडता आले नाही. या घटनेमुळे तरुणांमधील भावनिक तणाव, रिलेशनशिपमधील फसवणूक आणि मानसिक आरोग्याचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

### युद्ध पुन्हा भडकणार! अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचा पलटवार; अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रांचा मारा

तेहरान : अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव पुन्हा एकदा धोकादायक वळणावर पोहोचला असून, मध्यपूर्वेत युद्ध भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चर्चेच्या फेऱ्या सुरू असतानाच अमेरिकेने इराणमधील अब्बास पोर्ट परिसरात केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर इराणने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. इस्लामिक रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्स ने अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केल्याचा दावा केला आहे. या घडामोडींमुळे आखाती देशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

इराणची वृत्तसंस्था 'तसनीम'च्या वृत्तानुसार, स्थानिक वेळेनुसार पहाटे ४.५० वाजता अब्बास पोर्ट परिसरात अमेरिकेने हवाई हल्ले केले. त्यानंतर लगेचच घ्ीेंउ ने प्रत्युत्तरादाखल अमेरिकन लष्करी तळांवर कारवाई सुरू केली. मात्र, कोणत्या तळांना लक्ष्य करण्यात आले याची अधिकृत माहिती अद्याप देण्यात आलेली नाही.

दरम्यान, इस्लामिक रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्स ने अमेरिकेला थेट इशारा देत म्हटले आहे की, ''इराणवर पुन्हा हल्ले झाले तर त्याला निर्णायक आणि अधिक तीव्र उत्तर दिले जाईल. त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.'' या संघर्षाचे पडसाद आता शेजारील देशांमध्येही उमटू लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वृत्तानुसार, अमेरिकन अधिकाऱ्यांनीही इराणमधील काही लष्करी ठिकाणांवर रात्रीभर कारवाया सुरू असल्याचे मान्य केले आहे.

# नीट परीक्षेच्या सुरक्षेसाठी आता भारतीय लष्कराची मदत?

## गैरप्रकार टाळण्यासाठी केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

नवी दिल्ली : देशभरात प्रचंड खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्र सरकार आता मोठी आणि कठोर पावले उचलण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. भविष्यात प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकार रोखण्यासाठी आणि परीक्षेची विश्वासार्हता अबाधित राखण्यासाठी आगामी नीट परीक्षांच्या सुरक्षेची जबाबदारी थेट भारतीय लष्कराकडे सोपवण्याबाबत केंद्र सरकार गांभीर्याने विचार करत असल्याचे सूत्रांकडून समजते.




या संदर्भात दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक सुरू असून, त्यात शिक्षण मंत्रालय, गृहमंत्रालय आणि सुरक्षा यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाल्याची माहिती आहे. प्रश्नपत्रिका छपाईपासून ते परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचवण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत लष्कराच्या गोपनीय आणि अत्याधुनिक सुरक्षा पद्धतींचा वापर करण्याचा प्रस्ताव चर्चेत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, दुसरीकडे सीबीआयने पेपरफुटी प्रकरणात तपासाची व्याप्ती आणखी वाढवली आहे. या प्रकरणात आणखी दोघांना अटक करण्यात आली असून, अटक आरोपींची संख्या आता १३ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, अलीकडील दोन्ही अटक महाराष्ट्रातून झाल्याने राज्यातील कनेक्शन अधिक गडद होताना दिसत आहे. सीबीआयने लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली आहे. तपासात त्यांनी रसायनशास्त्र विषयाचे लीक झालेले प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा आरोप समोर आला आहे. तसेच पुण्यातील 'अइश्अ' कोचिंग इन्स्टिट्यूटमधील भौतिकशास्त्राचे शिक्षक तेजस हर्षदकुमार शाह यांनाही अटक करण्यात आली आहे. तपासात धक्कादायक माहिती उघड झाली असून, तेजस शाह याने आरोपी मनिषा हवालदारकडून मिळालेल्या लीक प्रश्नपत्रिकेचा संपर्क मोबाईलमध्ये 'उध' या नावाने सेव्ह केला होता.

या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी सीबीआयने आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगरसह देशभरातील तब्बल ४९ ठिकाणी छापेमारी केली आहे. या कारवाईत अनेक महत्त्वाची कागदपत्रे, मोबाईल फोन, हार्डडिस्क आणि लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. तपासात रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र या तिन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिका परीक्षा होण्यापूर्वीच लीक झाल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे हे केवळ राज्यापुरते मर्यादित नसून देशभर पसरलेल्या आंतरराज्यीय रॅकेटचे जाळे असल्याचा संशय अधिक बळावला आहे. या प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, केंद्र सरकार आता परीक्षा प्रक्रियेत आमूलाग्र बदल करण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.

### शेतात शर्टवर गेला आणि बनियनवर परतला, तिथंच पोलिसांना गावला, कोल्हापूरला हादरवणाऱ्या प्रकरणात मोठी कारवाई

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** उसाच्या शेतात एका महिलेचा विवस्त्रावस्थेतील मृतदेह आढळल्याने कोल्हापुरात खळबळ उडाली होती. पन्हाळा तालुक्यातील कोलोलीतील या प्रकरणात धक्कादायक खुलासा झाला आहे. विधवा महिलेवर अतिप्रसंग करताना तिने विरोध केल्याने तिच्यावर विळ्याने वार करून खून करण्यात आला. याप्रकरणी आरोपी अंकुश हणमंतराव पाटील (वय ५१) याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. पन्हाळा पोलिसांनी त्याला अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मृत छबूताई सर्जेराव पाटील (वय ५५) यांच्या पतीचे निधन झाले असून त्या गावी एकट्याच राहात होत्या. रविवारी दुपारी मासुलकी नावाच्या शेतावर कामासाठी त्या गेल्या होत्या. रात्री उशिरापर्यंत परत न आल्याने नातेवाईक आणि गावकऱ्यांनी त्यांचा शोध घेतला. तेव्हा उसाच्या एका सरीत त्यांचा विवस्त्रावस्थेतील मृतदेह आढळला होता. अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने वार केल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे तपासातून पुढे आले.

या प्रकरणाची माहिती मिळताच पन्हाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि तपासाची चक्रे फिरवली. गावातील सीसीटीव्ही तपासले असता गावातीलच अंकुश पाटील याच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यामुळे पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केला. तेव्हा धक्कादायक माहिती पुढे आली. छबूताई यांनी औषधाचा पंप, चप्पल बांधावर काढून ठेवली. तेव्हा त्यांच्या मागून अंकुश पाटील आला होता. त्याने जबरदस्तीने उसात नेऊन अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनी त्याला विरोध केला. खवळलेल्या आरोपी अंकुश पाटील याने धारदार विळ्याने त्यांच्या हातावर आणि डोक्यावर वार केले. हे घाव वर्मी बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### नांदेड शहरातील ऐतिहासिक ईदगाहमध्ये ईद-उल-अझहाची नमाज अदा

नांदेड : आज सकाळी साडेआठ वाजता नांदेड शहरातील ऐतिहासिक ईदगाहमध्ये मोठ्या भक्तीभावाने आणि आदराने ईद-उल-अझहाची नमाज अदा करण्यात आली. शहर आणि आसपासच्या भागांतील मोठ्या संख्येने इस्लामचे अनुयायी सकाळपासूनच ईदगाहमध्ये पोहोचू लागले होते. ईदगाहचे वातावरण अध्यात्म, एकता आणि बंधुत्वाचे एक सुंदर उदाहरण सादर करत होते. या प्रसंगी, प्रख्यात धर्मपंडित मुफ्ती खलील-उर-रहमान साहिब यांनी आपल्या विशेष भाषणात, ईद-उल-अझहाचे सद्गुण आणि हजरत इब्राहिम (अ.स.) व हजरत इस्माईल (अ.स.) यांच्या बलिदानाच्या महान सुन्नतीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, ईद-उल-अझहा आपल्याला नि:स्वार्थता, त्याग, प्रेम आणि माणुसकीचा धडा शिकवते आणि आपण गरीब, गरजू आणि गरजू लोकांची विशेष काळजी घेतली पाहिजे. ईदची नमाज मौलाना साद अब्दुल्ला साहिब यांनी पठण केली, तर मुहम्मद झुबैर फारुकी साहिब यांनी प्रवचन दिले. प्रवचनात, मुस्लिम उम्माची एकता, शांतता आणि सुरक्षितता, बंधुत्व आणि देशाची प्रगती व समृद्धी यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आल्या.

त्यानंतर, मौलाना साद अब्दुल्ला साहिब यांनी सामूहिक प्रार्थना केली, ज्यात देश आणि राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी, शांततेसाठी, बंधुत्वासाठी आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. प्रार्थनेनंतर, ईदगाहमध्ये उपस्थित असलेल्या लोकांनी एकमेकांना मिठी मारली आणि ईद-उल-अझहाच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुले, तरुण आणि वडीलधाऱ्यांमध्ये ईदचा आनंद स्पष्टपणे दिसत होता.

# लातूर रेल्वे स्थानकाचा कायापालट वेगात!

## पिट लाईनचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार – खासदार शिवाजी काळगे

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या विविध विकासकामांना आता गती मिळाली असून, बहुप्रतिक्षित पिट लाईनचे काम येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती खासदार शिवाजी काळगे यांनी दिली आहे.

लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे आणि विभागीय रेल्वे सल्लागार समिती सदस्य संजय निलेगावकर यांनी गुरुवारी लातूर रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या पिट लाईनसह विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विभागीय रेल्वे अभियंता अलुरे, स्टेशन मॅनेजर संजीवकुमार अर्धापूर, रेल्वे अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

पिट लाईनच्या कामाचा आढावा घेताना खासदार काळगे यांनी कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये, अशा स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. रेल्वे अधिकाऱ्यांनी हे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले.

दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक २ ची लांबी आणि रुंदी वाढविण्याचे काम तसेच नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ च्या प्रस्तावित कामाचीही पाहणी करण्यात आली. लातूर रेल्वे स्थानकाचा वाढता प्रवासी भार लक्षात घेता या कामांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नवीन फूट ओव्हर ब्रिज आणि लिफ्टची सुविधाबैठकीदरम्यान रेल्वे अधिकाऱ्यांनी स्थानकावर नवीन दादरा उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली. या पुलासोबतच प्रवाशांच्या सोयीसाठी लिफ्टची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.



सध्या लातूर रेल्वे स्थानकावर प्रवेशासाठी केवळ एकच गेट असल्याने मुंबई गाडी आल्यानंतर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. ही समस्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने दुसरे प्रवेशद्वार मंजूर केले आहे. मात्र त्यासंदर्भातील काही तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधण्याच्या सूचना खासदार काळगे यांनी दिल्या.

मुरुड स्टेशनला क्रॉसिंग सुविधा देण्याची चर्चायावेळी मुरुड रेल्वे स्थानकाचा दर्जा वाढवून तेथे क्रॉसिंग सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. तसेच लातूर रेल्वे स्थानकावर महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महिला जीआरपी पोलिसांची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात पोलीस अधीक्षकांशी चर्चा करण्यात येणार असल्याचे खासदारांनी सांगितले.

गुड्स शेडवर कव्हरचे कामही मंजूरलातूर रेल्वे स्थानकावरील गुड्स शेड प्लॅटफॉर्मवर कव्हर उभारण्याचे काम मंजूर झाले असून, ते लवकरच सुरू होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

लातूर रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी संयुक्तपणे पुढाकार घेतल्याने आगामी काळात प्रवाशांना अधिक आधुनिक आणि सुसज्ज सुविधा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.